MHRG070004282026

**फौजदारी चौकशी अर्ज क्र.५६/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार सौ. नलिनी नारायण कदम, राहणार – वन ट्री हिल पॉईंट, शिवाजी रोड, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड यांनी माथेरान पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्र.१/२०२६ मधील जप्त करण्यात आलेली मालमत्ता १) सोन्याचे गंठन २) सोन्याची माळ ३) सोन्याची सर व वाटी (मंगळसूत्र), ४) सोन्याची नथ हा मुद्देमाल परत मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सदर मालमत्ता अर्जदाराच्या घरातून चोरीस गेली होती व आरोपीकडून जप्त करण्यात आली आहे. अर्जदाराने सोन्याची नथबाबत मूळ बिल/ पावती शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु ती उपलब्ध झाली नाही. अर्जदारास सदर मालमत्ता वैयक्तीक वापरासाठी आवश्यक आहे. सदर मालमत्ता पोलीस ताब्यात निष्क्रीय अवस्थेत राहिल्यास हवामानामुळे ती खराब होण्याची शक्यता आहे व त्यामुळे अर्जदारास अपूरणीय नुकसान होईल. सदर मालमत्ता तपासासाठी आवश्यक राहिलेली नाही व न्यायालयाच्या आदेशानुसार अर्जदार सदर मालमत्ता न्यायालयात सादर करण्यास तयार आहे. अर्जदार कथन करतात की, माननीय न्यायालयाची परवानगी घेतल्याशिवाय अर्जदार सदर मालमत्ता

कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करणार नाही व न्यायालयाच्या सर्व आदेशांचे पालन करील. मे. न्यायालयाने दिलेल्या सर्व अटी व शर्ती अर्जदार पालन करण्यास तयार आहे. इतर योग्य तो आदेश पारित करण्यात यावेत.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदर प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल हा आरोपीचे ताब्यातून जप्त करण्यात आलेला आहे. सदरचा जप्त मुद्देमाल हा गुन्हा शाबितीसाठी महत्त्वाचा पुरावा आहे. सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत केल्यास त्यामध्ये फेरबदल अथवा विक्री करण्याची शक्यता आहे. सदरचा मुद्देमाल विक्री केल्यास गुन्हा शाबीतीसाठी अडथळा निर्माण होईल. सबब अर्जदार यांचा अर्ज नांमजूर करण्यात यावा, ही विनंती. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, नमूद गुन्हयातील जप्त मुद्देमाल सोन्याचे दागिने हे फिर्यादी यांचेच असल्याचे तपासादरम्यान पडताळणी झालेली असून त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन अर्जात नमूद सोन्याचे दागिने सदर अर्जदार यांना योग्य अटी व शर्तीवर परत देण्यास मे. न्यायालयांचे आदेश होणेस विनंती आहे.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी माथेरान एफ.आय.आर.क्रं. १/२०२६ ची झेरॉक्स प्रत, बिल क्रं.२५ दिनांक २५/११/२०२० ची प्रमाणित प्रत, बिल क्रं.२४ दिनांक २५/१०/२०२० ची प्रमाणित प्रत, दिनांक १६/१०/२०२३ बिलाची प्रमाणीत प्रत, अर्जदार यांचे आधारकार्डची प्रमाणित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेले आहेत. अर्जदाराने सत्यप्रतिज्ञापत्र दाखल करुन सदर अर्जासोबत सोने खरेदीच्या पावत्या दाखल केल्या आहेत.

०५. सबब, सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत देणे मला उचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

:: **आदेश** ::

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | माथेरान पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र.१/२०२६ मधील जप्त मुद्देमाल म्हणजेच १) सोन्याचे गंठन २) सोन्याची माळ ३) सोन्याची सर व वाटी (मंगळसूत्र), ४) सोन्याची नथ हा अर्जदार सौ. नलिनी नारायण कदम, यांना रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावा. |
| ३. | जप्त मुद्देमाल हा अर्जदाराचे नसल्याचे निष्पन्न झाल्यास सदर मुद्देमालाची किंमत अगर मुद्देमाल अर्जदार यांनी परत करावा. |
| ४. | अर्जदाराने सदर मुद्देमाल हा निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावा. तसेच सदर मुद्देमाल हा गहाण, दान, विक्री, त्याचे स्वरुपात कोणताही बदल न करणे, कोणासही हस्तांतरण न करणे व नष्ट न करणे. |
| ५. | तपासीक अंमलदार यांनी अर्जदारास सदरचा मुद्देमाल देण्यापुर्वी त्याचे छायाचित्र अर्जदाराच्या खर्चाने काढुन त्याचा सविस्तर पंचनामा तयार करावा व गुन्हयाच्या दोषारोपत्रात त्याचा समावेश करावा. |
| ६. | अर्जदाराने सदर मुद्देमालाचा वापर कोणत्याही अवैध कारणासाठी करु नये तसेच सदर मुद्देमाल अवैध कोणासही वापरण्यास देऊ नये. |
| ७. | सदर आदेशाची प्रत माथेरान पोलीस स्टेशन यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2026.07.04 18:39:01 +0530

कर्जत.
दिनांक : ०४/०७/२०२६

**(ए. एस. वाडकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड